महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक
**मुख्य संपादक : साजीद बडगुजर**

http://lokadesh.in
विशेषांक
# लोकादेश

किनवट, वर्षे १७ वे, अंक ४१ वा,
शनिवार, दि.०५ ऑक्टोबर २०२४, पाने ०४
RNI No. MAHMAR/2007/20732
Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025



# राज्यमाता आणि गोठ्यातले आपण!

सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीत हा शाहू- फुले- आंबेडकर यांचा महाराष्ट्र यापुढच्या काळात शंकराचार्य अविमुक्तेरानंद यांचा- अलीकडचा लोकप्रिय राजकीय शब्दप्रयोग करायचा तर- आभाळभर ऋणी राहील. या ऋणातून उतराई कसे व्हावे हे पुढच्या कित्येक पिढ्यांना कळणार नाही; इतके हे ऋण मोठे आहे. त्याचा संबंध या शंकराचार्यांनी आधी 'मातोश्री'वर पायधूळ झाडून, तेथील पाहुणचार झोडून, पोटभर आशीर्वाद देऊन नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही तसेच आशीर्वाद दिले या त्यांच्या धार्मिक चातुर्याशी अजिबात नाही. असे सर्व डगरींवर एकाच वेळी पाय रोवून उभे राहता येणे यालाच अध्यात्म असे म्हणत असावेत. आणि असेही आत्मा एक आहे, असे म्हणतातच. तेव्हा 'मातोश्री'वर केलेली आशीर्वादवर्षा 'वर्षा'वासीयावरही केली तर कुठे बिघडते असाही स्थूलातून सूक्ष्मात जाणारा विचार शंकराचार्यांनी केला असणार. या ऋणाचा संबंध आपणास आणखी एक शंकराचार्य प्राप्त झाले, या आनंदवार्तेशीही नाही. पूर्वीच्या काळी या भारतवर्षात तीन आणि एक अर्धा इतकेच शंकराचार्य असत. हे अर्थातच पं. नेहरूंचे पाप. त्यांनी आयआयटी, आयआयएम, एम्स यांचा पुरेसा विस्तार केलाच नाही. त्यामुळे फक्त मूठभरांनाच त्याचा लाभ झाला. हे मूठभर त्यामुळे कायम पं. नेहरूंचा जप करीत बसतात. शंकराचार्यांबाबतही त्यांनी असाच हात आखडता घेतला असावा. काही का असेना, त्यातून त्यांचा हिंदुद्वेषच दिसून येतो. या देशाचा, हिंदूंचा आकार लक्षात घेता अधिकाधिक शंकराचार्यांची आपणास गरज होती. ती गेली दहा वर्षे यथासांग पूर्ण होताना दिसते. त्याचाच एक भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर शंकराचार्य निर्मिती आपल्या देशात सुरू आहे. खरे तर 'एक जिल्हा, एक शंकराचार्य' अशी योजनाच हाती घ्यायला हवी. तसे झाल्यास हिंदूंचा उद्धार झालाच म्हणून समजा. तथापि तो होईपर्यंत सध्या उपलब्ध असलेल्या शंकराचार्यांवर आपणास भागवून घ्यावे लागेल. तूर्त त्यांनी आपणावर केलेल्या उपकारांविषयी.

ते आहेत गोमातेस 'राज्यमाता' दर्जा देण्याच्या त्यांच्या सूचनेबद्दल. या राज्यातील नव्हे तर समग्र देश आणि खरे तर पृथ्वीवरील गोधन यामुळे खूश झाले असून त्यांच्या सुमधुर हंबरड्याने आसमंत कसा भरून गेला आहे. यामुळे मेनका गांधींसह सर्वच प्राणीप्रेमींस आनंद अनावर झाला असून तो कसा व्यक्त करावा हे न कळून रस्त्यारस्त्यांवर कोणा गोप्रेमीने पुण्यसंचयासाठी भरवलेल्या फरसाण-गाठ्यांचा रवंथ करीत बसलेल्या, हाडे वर आलेल्या राज्यमातांचा शोध घेण्यासाठी झुंडीच्या झुंडी घराबाहेर पडल्या आहेत. गोमातेस 'राज्यमाता' जाहीर करा हा अत्यंत बुद्धिजन्य, पंडिती, प्रज्ञावान इत्यादी सल्ला निवडणुकेच्छू एकनाथरावांस साक्षात शंकराचार्यांनी दिला. धर्मरक्षक, धर्मप्रेमी आणि धर्मवीरांचे अनुयायी एकनाथराव हा शंकराचार्यांचा शब्द खाली कसा पडू देतील? त्यांनी ताबडतोब मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय मांडला आणि त्यास नवे गोप्रतिपालक अजितदादा पवार यांनी त्वरेने अनुमोदन दिले. जुने गोप्रतिपालक देवेंद्र ऊर्फ देवाभाऊ यांनी हे श्रेय घेऊ नये यासाठी अजितदादांनी दाखवलेली चपळाई अगदी नोंद घ्यावी अशी. गोमातेचे प्रेमच असे आहे. तेव्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा मुद्दा मंजूर होणे हा उपचार ठरला. लगेच

**...मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा मुद्दा मंजूर होणे हा उपचार ठरला. लगेच सरकारी अध्यादेश निघाला. 'राज्यमाता' असे शिक्कामोर्तब गायीगायींवर झालेही...**



सरकारी अध्यादेश निघाला. 'राज्यमाता' असे शिक्कामोर्तब गायीगायींवर झालेही. सुरुवातीस थोडा विलंब झाला तो 'राज्यमाता' की 'राजमाता' या शब्दच्छलाचा गुंता सुटेपर्यंत. अखेर 'राज्यमाता' हा शब्दप्रयोग उचित असल्याचे प्रमाणपत्र अलीकडचे वैय्याकरणी संजय शिरसाट आणि तत्समांनी दिल्यानंतर सरकारी आदेश प्रसृत झाला म्हणतात.

आता लवकरच- बहुधा २४ तासांत- सरकारी आज्ञावलीही प्रसिद्ध होणार असून तीत 'राज्यमातेशी कसे वागावे' इत्यादी राजशिष्टाचारसंबंधी मुद्दे असतील. जसे की यापुढे रस्त्यावर फतकल मारून बसलेल्या राज्यमाता दिसल्यास वाहतुकीत व्यत्यय येत असल्याच्या कारणांसाठी राज्यमातांस उठवता येणार नाही. वाहतुकीने वाटल्यास राज्यमातेस वळसा घालून जावे अथवा तसेच वाहनांत बसून राहावे. शेतक-यांस अथवा गोधन प्रतिपालकांस यापुढे दूध देत नाही, सरळ घरी येत नाही, रानोमाळ भटकते इत्यादी कारणांसाठी शेपटी पिरगाळता येणार नाही. राज्यमातेची शेपटी कशी काय पिळणार? निसर्गाच्या नियमानुसार या चतुष्पादाने खाल्लेल्या पदार्थांचे कोठेही उत्सर्जन झाले तरी त्यास यापुढे 'शेण' असे म्हणता येणार नाही. राज्यमातेच्या विष्ठेस शेण कसे म्हणणार? यावरून 'शेण खाल्ले' या अपमान निदर्शक शब्दप्रयोगासही कायमचे हद्दपार करण्याचा आदेश शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिल्याचे कळते. राज्यभरातील अशा राज्यमातांच्या वास्तव्यासाठी ठिकठिकाणच्या शाळा उपलब्ध करून द्याव्यात या केसरकर यांच्या मताची व्यवहार्यता तपासण्याचे काम सुरू आहे. ते झाले की या शाळांतून राज्यमातांच्या वास्तव्याची सोय होऊ शकेल. एरवीही या शाळांची अवस्था गोठ्यापेक्षा काही कमी नसल्याने तेथे राहण्याची संधी मिळाल्यास राज्यमातांस घरचे वातावरण अनुभवता येईल, हा यामागील विचार. आणि तसेही या शाळांत राहिले आहे काय? तेव्हा या पडक्या-झडक्या वास्तूंत राज्यमातांची सोय केल्यास काही पुण्य तरी सरकारच्या गाठीशी जमा होईल.

या पाठोपाठ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विज्ञानवादी वाङ्मयावर बंदी कशी आणता येईल याचेही प्रयत्न या संदर्भात सुरू करण्यात आले असल्याचे कळते. एकतर अलीकडच्या काळात विज्ञानवाद ही संकल्पनाच खरे तर कालबाह्य झालेली आहे. गावोगावी भरणारे सत्संग, नवनव्या बाबा- बापू- महाराजांचा उदय, त्यांच्या दर्शनासाठी आसुसलेल्या लहानथोरांची झुंबड, सर्वोच्च सत्ताधीशांकडून या पुण्यपुरुषांना दिला जाणारा आश्रय इत्यादी पाहिले की विज्ञानवादाचा फोलपणा मठ्ठातील मठ्ठासही लक्षात येईल. असे असताना कोण सावरकर आणि कसले त्यांचे विज्ञानवादी विचार! त्यांच्याविषयी आदर व्यक्त करायला स्वातंत्र्यवीर ही उपाधी आणि 'ने मजसी ने' गायिले की झाले. कशास हवा त्यांचा विज्ञानवादी विचार? हे सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीत. तेव्हा सावरकरांनी तो केला असेल म्हणून काय झाले? एकदा का राज्यमातेचा दर्जा मिळाला की तीस 'उपयुक्त पशु' ठरवणा-या सावरकरांस विसरलेले बरे. 'राज्यमाते'च्या पुत्राविषयीही सावरकर असेच काही अद्वातद्वा बोलले आहेत. त्यामुळे त्यांच्या अशा वाङ्मयावर एकदा बंदी घातली की प्र न मिटला. महाराष्ट्र सरकारनेच बंदी घातली म्हटल्यावर राज्याबाहेर त्यांचे वाचणार कोण आणि कशाला? यथावकाश सगळ्यांच्या मनात 'राज्यमाता' घर करून बसतील यात शंका नाही.

फक्त कोणी आता 'राज्यपिता कोण' हा प्र न तेवढा उपस्थित करू नये. प्रत्येक 'मातेस' एक भिन्नलिंगी साथीदार असल्याखेरीज तूर्त तरी प्रजोत्पादन होऊ शकत नाही, हे खरे असले तरी उभयतांतील 'संबंध' हे क्षणिक असतात असे साक्षात आचार्य अत्रे यांनीच सांगून ठेवलेले आहे. (पाहा : स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळची माता असते.) तेव्हा राज्यपिता कोण हा प्र न अयोग्य. हे असले क्षुद्र मुद्दे विसरून आपण सर्व जण गायींस राज्यमातेचा दर्जा देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करू या आणि हा दर्जा देता यावा म्हणून या राज्याची अवस्था जणू गोठा अशी केली याबद्दल सरकारचे आभार मानू या.

-सौजन्य दै.लोकसत्ता



# एक देश एक निवडणूक : राष्ट्रीय की राजकीय गरज?

एक देश एक निवडणूक हे धोरण वरवर सुधारणावादी किंवा प्रागतिक वाटते, पण ते तसे नाही. १८ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली (२०२३) नेमलेल्या सात सदस्यीय उच्चस्तरीय समितीचा अहवालास केंद्रीय कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली. म्हणून आता एक देश एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. या समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे. एक देश एक निवडणूक ही भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मूळ विचारधारेचा म्हणजेच एक देश एक धोरण'चा एक भाग आहे. आतापर्यंत म्हणजेच २०१४ पासून या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जात आहे. उदा : एक ध्वज, एक कर, रेशनकार्ड, परीक्षा, भाषा, निवृत्ती योजना, एक स्टुडंट आयडी (अपार) इत्यादी. ही सर्व धोरणाचे मूळ संघ व त्यांच्या प्रवर्तकाच्या विचारधारेत आढळते. विशेषतः हेगडेवार, सावरकर, गोळवळकर गुरुजी व दीनदयाळ उपाध्याय इ. हिंदू राष्ट्रवाद, राष्ट्रीय अखंडता, सांस्कृतिक एकता इत्यादी मधून हे धोरण उदयास आलेले दिसते. ही धोरणे आणण्यामागचा सर्वसाधारण हेतू म्हणजे राजकीय स्थिरता, प्रबळ केंद्र सरकार, राष्ट्रीय अखंडता, एकसमान विकास, प्रशासनिक सुबत्ता, विकासाला गती इ. असे भाजप समजते. एक देश एक निवडणूक हा त्याचाच एक भाग आहे पण या पाठीमागचा उद्देश मात्र फार व्युहात्मक दिसतो. वरवर पाहता हे धोरण सुधारणावादी किंवा प्रागतिक वाटते पण ते तेवढे सोपे नाही. खरे तर या धोरणाच्या समर्थनार्थ जे मुद्दे पुढे येतात ती फार उथळ आहेत. उदा : कमी खर्च, वेळ कमी करणे, वारंवार निवडणुका टाळणे, अस्थिर सरकार, प्रशासकीय गैरसोय इ. पण हे मुद्दे दाखवायचे आहेत, पण त्यापाठीमागचा मूळ हेतू फारच वेगळा दिसतो. त्याची पुढे चर्चा येईल.

एक देश एक निवडणूक हे धोरण जगात अमेरिका, कॅनडा, ब्राझील, द.आफ्रिका, स्वीडन, इंडोनेशिया, जर्मनी इ. देशांनी राबविलेले आहे. तिथे यशस्वी झाले कारण कमी लोकसंख्या, एकात्म शासन, विविधतेचा अभाव किंवा अध्यक्षीय लोकशाही पद्धत इत्यादीने तर काही देशात प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धत व सूची पद्धत (List method) या दोन्ही निवडणूक पद्धतीचा वापर करून ही पद्धत यशस्वी झालेली दिसते. भारतासारख्या संसदीय संघराज्यात्मक शासन पद्धतीत व विविधता असलेल्या देशात ही पद्धत राबविणे कठीण व आव्हानात्मक होऊ शकते. संविधान परिषदेत जेव्हा अनेक प्रश्नांवर चर्चा झाली त्यामध्ये 'एक देश एक निवडणूक' हा मुद्दा चर्चेला आलेला दिसत नाही. हा मुद्दा घटनाकर्त्यांना महत्त्वाचा वाटत असता तर त्यावर निर्ि चतच संविधान सभेत चर्चा झाली असती. तसेच संविधान सभेत जेव्हा देशासाठी कोणती शासनपद्धती उत्कृष्ट असेल असा मुद्दा चर्चेला आला तेव्हा पं. जवाहलाल नेहरू व इतर तत्कालीन नेत्यांनी अध्यक्षीय शासनपद्धतीपेक्षा संसदीय शासन पद्धतीला पसंती दिली. ब्रिटिशामुळे आपल्याला आलेला प्रत्यक्ष अनुभव म्हणून आपण एकमताने संसदीय शासन पद्धतीचा ब्रिटिश वेस्ट मिनिस्टर नमुना स्वीकारला. त्यावेळी त्याच्या समर्थनार्थ डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, 'देशाला स्थिर सरकारपेक्षा जबाबदार सरकारची गरज आहे.' म्हणजे जनतेला उत्तरदायी असलेले सरकार अपेक्षित आहे. हाच तर ख-या लोकशाहीचा आधार आहे.

भारताची तेव्हाची तत्कालीन गरज/परिस्थिती पाहता घटनाकर्त्यांनी सशक्त केंद्र सरकारचा पुरस्कार केला. पण भारत हा विविधतेने संपन्न असलेला देश असल्यामुळे एकात्म शासनाऐवजी संघराज्य पद्धत स्वीकारली गेली. भारताची शासनपद्धती ही मिश्र स्वरूपाची आहे. ती वरून संघराज्यात्मक दिसते पण विशिष्ट परिस्थितीत एकात्म आहे. संसदीय शासनपद्धतीत सरकारला नेहमी कायदेमंडळाशी जबाबदार असावे लागते. त्यामुळे सरकारचा कार्यकाळ ठरावीक पाच वर्षांचा असला तरी तो निर्ि चतही नाही. कारण सरकार केव्हाही अल्पमतात येऊ शकते. म्हणून भारतात स्थिर पूर्ण पाच वर्षांसाठी सरकार अस्तित्वात राहू शकत नाही. याचे कारण भारतातील पक्ष पद्धत व निवडणूक पद्धत.

भारतात राजकीय पक्ष आहेत पण पक्षपद्धती नाही असे म्हटले जाते. त्याचे कारण पक्ष शिस्त, निर्ि चत विचारधारा, कार्यक्रम, पक्षांतर्गत लोकशाही इत्यादी वेगळेपण दिसून येत नाही. जसे की अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये आहे. तसेच भारतात विविध पक्ष आहेत ज्यात राष्ट्रीय, प्रादेशिक, नोंदणीकृत इ. मुळे निवडणुकीतील मतदान विभागले जाते. अलीकडे प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय पक्षापेक्षा जास्त मते घेत आहेत. एक पक्ष वर्चस्व पद्धतीचा -हास होऊन प्रादेशिक किंवा छोट्या पक्षाचे महत्त्व वाढलेले आहे. त्यामुळे निवडणूक पूर्व किंवा निवडणुकीनंतर राजकीय आघाड्या करून सत्ता स्थापनेचा दावा करावा लागतो. म्हणून स्थिर पूर्ण कार्यकाळासाठी बहुमत मिळू शकत नाही. दुसरा मुद्दा म्हणजे निवडणूक पद्धत. भारतात राज्यसभा व राज्य विधान परिषदा, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुका प्रमाणशीर एकल संक्रमणीय पद्धतीनुसार होतात आणि त्या लोकसभा व विधानसभेसोबत होत नाहीत. जसे अमेरिकेत होतात किंवा इतर देशात भारतात लोकसभा, राज्य विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका "The first past-the post voting' या पद्धतीने होत असल्यामुळे साध्या बहुमताने प्रतिनिधी निवडून येतात. तसेच मिळालेल्या मताच्या प्रमाणात उमेदवार निवडून येत नाहीत. हे प्रमाण सतत बदलत असते. या दोन्ही घटकांमुळे पूर्ण बहुमत मिळण्याची शक्यता दिवसेंदिवस कमी होत गेली. आता एका राष्ट्रीय पक्षाचे सरकार ऐवजी राजकीय आघाड्याची सरकारे बनत आहेत. त्यामुळे निर्ि चत स्थिर सरकारची हमी देताच येत नाही. कारण राजकीय परिस्थिती सतत बदलत असते. याशिवायही आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे पक्षांतराचा. भारतात केंद्रीय व राज्य कायदेमंडळाचे सभासद निवडून आल्यानंतर व्यक्तिगत स्वार्थ, मंत्रिपदाचे आमिष, सत्तेचे आकर्षण, तुरुंगात जाण्याची भीती यामुळे पक्षांतर करत राहतात. याचा परिणाम असा होतो की, सरकारे अल्पमतात येतात. हे तीन वास्तविकदर्शक मुद्दे लक्षात घेता भारतात पूर्ण पाच वर्षांसाठी निवडणुका घेणे व सरकार टिकवणे फार आव्हानात्मक झालेले आहे. म्हणून एक देश एक निवडणूक घेणे व्यवहार्य वाटत नाही. याबरोबरच काही तांत्रिक व घटनात्मक अडचणीसुद्धा विचारात घ्याव्या लागतील. (१) यामध्ये संविधाच्या मूलभूत संरचनेच्या विरुद्ध ही पद्धत जाऊ शकते उदा : संघराज्य व्यवस्था (२) राज्याच्या स्वायत्ततेला धोका (३) संविधानात किमान १८ दुरुस्त्या कराव्या लागतील. ज्यामध्ये विशेष दुरुस्ती येऊ शकते. (४) प्रादेशिक पक्षाचे महत्त्व कमी होईल. (५) विधिमंडळाचा कार्यकाळी कमी किंवा वाढवणे हे असंविधानिक होईल. इ. मुद्दे विचारात घ्यावे लागतील.

पण या समितीने पुढील सबबी समोर करून या निवडणूक पद्धतीची शिफारस केलेली आहे. ज्यात (१) स्थिर सरकार मिळेल. (२) निवडणूक खर्च व इतर प्रशासकीय गैरसोय टाळेल. (३) धोरण सातत्य येईल. इ. बाबी तसेच या धोरणाच्या समर्थनार्थ राज्यघटना पतपरीक्षण आयोग, निवडणूक आयोग, नीती आयोग, निवडणूक सुधारणा आयोग, राष्ट्रीय विधि आयोग, संसदीय समित्या इ. शिफारसी व निष्कर्ष सादर केले जात आहेत. तसेच काही ऐतिहासिक पुरावेही सांगितले जात आहेत. जसे की १९५२ ते १९६७ पर्यंत दोन्ही निवडणुका एकत्रित होत होत्याच. आतापर्यंत देशाला ४०० निवडणुकांना सामोरे जावे लागले आहे. लोकसभेचा एका निवडणुकीचा खर्च आता १.३७ लाख कोटींवर पोहोचलेला आहे. वारंवार निवडणुकामुळे धोरण लकवा व मतदानाचे प्रमाण कमी होत आहे. यासाठी अनेक देशांचे दाखले दिले जात आहेत. प्रत्येक वर्षी दर पाच ते सहा राज्यांसाठी निवडणुक होतात इ. प्रमुख सबबी पुढे करण्यात आल्या.

या वरील कारणांचा अभ्यास करून समितीने आपल्या अहवालात काही शिफारशी केलेल्या आहेत. यासाठी देशातील विविध तज्ज्ञ, अभ्यासक, प्रशासक, न्यायाधीश, पक्ष, उद्योजक, अर्थतज्ज्ञ इत्यादींशी सल्लामसलत करण्यात आले. त्यानुसार पुढील पर्यायी पद्धतीची शिफारस केली गेली.

१) त्रिस्तरीय निवडणुका होतील. ज्यात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा, विधानपरिषद, लोकसभा व राज्य विधानसभेच्या एकत्रित निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शंभर दिवसांच्या आत निवडणुका घेणे.

२) सभागृहाचा कार्यकाल तीन प्रकारे गृहित धरला गेला (१) पूर्ण कार्यकाल (२) मध्यावधी कार्यकाल (३) अल्प कार्यकाल. यात लोकसभेच्या कार्यकालाबरोबर राज्य विधानसभेचा कार्यकाल २०२८ पर्यंत टप्प्याटप्प्याने कमी-जास्त एक करणे.

(३) त्रिशंकु किंवा अल्पमतात सरकार आल्यास उरलेल्या काळासाठी निवडणूका घेणे किंवा राष्ट्रपती/राज्यपालाच्या संमतीने राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनविणे व उर्वरित कार्यकाळ पूर्ण करणे.

४) एकच राष्ट्रीय मतदार यादी व ओळखपत्र तयार करणे इ. या अहवालात लोकसभेचे माजी सचिव सुभाष कश्यप यांनी केलेली अभिनव सूचना जर्मनी, जपान या देशात अवलंबली जाते. यावर समितीने विचार करण्यास काही हरकत नाही असा शेरा दिलेला आहे. जर्मनीत प्रमाणशीर पद्धतीने एकदाच सभागृह (बुंडेस्टॉग) व चान्सलरच्या निवडणुका होतात पण विरोधी पक्षास अविाास ठराव आणण्यापूर्वी पर्यायी नेता व सरकार द्यावा लागतो. त्यास 'रचनात्मक अविाास मत' (A Constructive Vote of Non-confidence) असे म्हणतात. ज्यामध्ये सरकारला केवळ विरोध करणे नसून पर्यायी व्यवस्था प्रस्तावित करावी लागते. ही प्रस्तावित पद्धत अंमलबजावणीत आणायची असेल तर काही बदल करावे लागतील. ज्यामध्ये संविधान दुरुस्ती करावी लागेल. जवळपास १८ संविधानिक दुरुस्त्या, अर्ध्या घटक राज्याच्या विधानसभेची मान्यता, प्रमुख राजकीय पक्षाची संमती, संसदेची मान्यता, लोकप्रतिनिधित्व कायद्यातील बदल इ.

वरील पद्धत न आणता ही काही रचनात्मक सुधारणा केल्यास या पद्धतीचे ध्यये साध्य करता येऊ शकते असे वाटते. उदा : १) सरकारची निवड, सभापतीची जशी निवड करतो तशी करावी. २) पक्षांतर बंदी कायदा अधिक कडक करावा. ३) पक्षांतर्गत लोकशाही अधिक सक्षम करावी. ४) राजकीय पक्ष माहिती अधिकारांतर्गत आणावे. ५) पक्षादेशाचा (WIP) वापर अपवादात्मक परिस्थितीतच केला जावा. ६) क. ३५६ चा गैरवापर करण्यास सक्त मनाई करावी. (एस.आर. बोमाई खटल्यातील मार्गदर्शक तत्त्वे) इ. वरील सर्व चर्चा आपण सैद्धांतिक किंवा तांत्रिक पातळीवर केली पण आता ही चर्चा आपण राजकीय गरज किंवा विशिष्ट उद्देश समोर ठेऊन ही पद्धत का प्रस्तावित केली जाते यावर करणार आहोत. ज्यामध्ये भाजपा व संघ परिवाराचा हेतू, काय आहे त्यादृष्टीने विचार करूया. सर्वप्रथम भाजपास राष्ट्रीय पक्ष म्हणून काय फायदा होईल ते पाहू.

भाजपासारख्या मोठ्या पक्षाला याचा राजकीय फायदा मिळू शकतो. कारण स्थानिक मुद्दे बाजूला ठेवून राष्ट्रीय मुद्दे चर्चेला आणता येतील. सत्तेत पाच वर्षे राहिल्यामुळे सत्तेवर मजबूत पकड मिळवणे व सततच्या निवडणुका टाळून विरोधी पक्षांना कमकुवत करणे हे करता येऊ शकते.

राष्ट्रीय व एकदाच निवडणुका झाल्यामुळे प्रादेशिक पक्षांना संपुष्टात आणून त्याच्यावरचे अवलंबित्व कमी करता येते. कारण अलीकडे राष्ट्रीय पक्षांना सरकार बनवताना प्रादेशिक पक्षाशी तडजोड करावी लागत आहे. राज्याचे स्वायत्त निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य कमी करता येते. तसेच संघराज्याला कमकुवत करता येऊ शकते.

विरोधी पक्षांना आपली भूमिका मांडण्यासाठी कमी संधी मिळू शकते आणि त्याचा लाभ सत्ताधारी पक्षांना होतो. इ.

या पद्धतीचे समर्थन करण्यापाठीमागे संघाचा काय हेतू असू शकतो?

हे ही वाचाआरक्षणप्र नी केवळ फडणवीसच लक्ष्य का?

संपूर्ण राष्ट्रवादाचा अजेंडा (Unified Nationalism), अखंड भारत, एकसंघ राष्ट्रवाद या विचाराला संघाने नेहमीच प्रोत्साहन दिलेले आहे. या निवडणुकीमुळे देश अधिक स्थिर होऊन त्यातून त्याचा हिंदुत्ववादी अजेंडा प्रगत होऊ शकतो. अल्पसंख्यांकांचे वारंवार लाड/तुष्टीकरण करण्याची विरोधकाची संधी कमी होईल.

प्रादेशिक पक्षाचे महत्त्व कमी होईल व राष्ट्रीय विषयाला जास्त प्राधान्य मिळेल. उदाः दक्षिणेत प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व आहे. प्रादेशिक पक्षामुळे फुटीरतावाद, उप-राष्ट्रवाद, प्रादेशिक संकुचित अस्मिता अखंड राष्ट्राला घातक ठरतात. हिंदुत्ववाद हा अधिक मोठा राष्ट्रीय मुद्दा आहे. तो अनेक प्रादेशिक मुद्यांवर मात करू शकतो. तो व्यापक पातळीवर मांडता येईल.

भाजपा किंवा संघ परिवाराला दुरगामी धोरणे राबविण्यासाठी उदा : राष्ट्रीय शिक्षण नीती, सांस्कृतिक पुनरुज्जीवनवाद, सामाजिक सुधारणाचे प्रकल्प राबवायचे असेल तर स्थिर सरकारची गरज आहे. शैक्षणिक व सांस्कृतिक दीर्घकालीन मुद्दे राबविण्यासाठी स्थिर सरकारची गरज आहे. या पद्धतीचे वरील संभाव्य परिणाम पाहता निष्कर्ष किंवा सार असा सांगता येईल की, या पद्धतीचे सर्वसाधारण प्रमुख परिणाम म्हणजे संविधानाच्या मूलभूत संरचना, राज्याची स्वायतत्ता, संघराज्य व्यवस्था, प्रादेशिक पक्षाचे खच्चीकरण, स्थानिक मुद्यांकडे दुर्लक्ष, निरंतर लोकशाही प्रक्रियेला धोका, लोकांना राजकीय प्रक्रियेत सामील न होण्याची संधी नाकरली जाईल इत्यादी खरे तर या पद्धतीची अपरिहार्य राजकीय गरज अधिक दिसते. कारण कॅनडा, इंग्लंड, अमेरिकेत 'Coat-Tails Effect' or down-ballot effect ही पद्धत आहे. Down's economic theory of democracy, Duverger's Law, Median Voter Theory, Bandwagn Theory इत्यादी.

निवडणूक जिंकण्यासाठीच्या सिद्धांताचा वापर अलिकडे वाढलेला दिसून येतो. हा प्रकार सामान्य मतदाराच्या लक्षात येत नाही किंवा प्रस्थापित सरकारविरोधी लाट नष्ट करण्यासाठी लोकांचे लक्ष विचलित करणे हाही हेतू बाळगून राष्ट्रीय गरजेपेक्षा पक्षीय गरज म्हणून ही योजना यशस्वी कशी करता येईल हाच प्रश्न यानिमित्ताने पडतो.

-सौजन्य दै.लोकसत्ता



**किनवट : भाजपाचे शहराध्यक्ष संतोष चनमनवार यांचा वाढदिवस शहरात व परिसरात हर्षोल्लासात साजरा करण्यात आला. श्रीनिवास यादवराव नेम्मानीवार यांच्या श्रीराम कंन्स्ट्रक्शन कार्यालयात वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी त्यांना शुभेच्छा देतांना श्रीनिवास यादवराव नेम्मानीवार, संपादक साजीद बडगुजर, राजु बेजंकीवार, सतीश बिराजदार, सागर नेम्मानीवार, शेखर नेम्मानीवार, उमेश मालाणी, गजानन यांचेसह मित्र मंडळ.**


## तहसील कार्यालय नायगांव (खै.) जिल्हा नांदेड

| | |
|---|---|
| वेबसाईट www.nanded.gov.in | ईमेल tahnaigaon@gmail.com |
| शाखा–जमाबंदी–2 क्र.2024 | भूसुधार कुळ–कावि–93 दि.8.05.2024 |

**जाहीर प्रगटन**

**मौ. राहेर ता. नायगांव खै. येथील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, श्री. शामसुंदर गुंडेराव इनामदार रा. राहेर यांनी अर्ज सादर करुन मौ. राहेर येथील गट क्र. १२६ च्या इतर अधिकारामध्ये साधे कुळ लक्ष्मण उमाजी (१००३३), हूसेनसाब (१००३३) साधे कुळ (१००३३) अशी नोंद दिसुन येत आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारात आलेले साधे कुळाचे नांव कमी करुन ७/१२ उतारा देण्यात यावा अशी विनंती केली आहे.**

**तरी याबाबत कुणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाचे आत मा. तहसिलदार नायगांव खै. यांच्याकडे सक्षम पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा.**

**अन्यथा विहीत मुदतीनंतर शासन नियमानुसार इतर अधिकारातील साधे कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद.**

**स्वाक्षरीत/–**

**तहसिलदार नायगांव खै.**




# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

**नवी दिल्ली, दि.३ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत.**

मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची ऐतिहासिक घटना घडली आहे. हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा दिवस आहे. राज्य शासनाने यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. हा क्षण प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या भाषेची समृद्धी आणि वारसा जपण्यास हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा मंत्री यांनी व्यक्त केली आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांचे साह्य झाले. त्यांच्यासह मोलाचे सहकार्य करणा-या तसेच मराठी भाषिक व मराठीवर प्रेम करणा-या सर्वांचे अभिनंदन करून त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले आहेत.

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य शासनाने केलेल्या पाठपुराव्यासंदर्भात मराठी भाषा विभागाने दिलेली माहिती**

अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. यासाठी केंद्र शासनाने निकष विहित केले आहेत.

१. १५००-२००० वर्षापर्यंतची अगदी सुरूवातीच्या ग्रंथाची / अभिलिखित इतिहासाची अति प्राचिनताः

२. भाषकांच्या पिढ्यांनी एक मौल्यवान वारसा म्हणून मानलेले प्राचीन साहित्य / ग्रंथाचा भागः

३. साहित्यिक परंपरा मूळ असावी आणि ती अन्य भाषक समाजाकडून उसनवारी केलेली नसावीः

४. अभिजात भाषा व साहित्य हे अर्वाचीन साहित्यापेक्षा भिन्न असल्यामुळ अभिजात भाषा आणि नंतरची रूपे किंवा तिच्या उप भाषा यामध्ये खंड देखील असू शकेल.

या निकषांच्या आधारे संशोधन आणि अभ्यास करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात राज्य शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती दि.१०.०१.२०१२ च्या शासन निर्णयानुसार गठीत केली होती.

या समितीने बरेचसे इतिहास संशोधन केले असून जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ इ. प्राचीन दस्ताऐवज तपासले असून त्यांचा आधार घेऊन पुराव्यासह एक सर्वंकष व परिपूर्ण अहवाल शासनास सादर केला आहे. या अहवालामध्ये सविस्तर विवेचनासह मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळणेसाठी विहीत केलेल्या निकषांची पूर्तता करते हे पुराव्यांसह स्पष्ट केले.

समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल दि.१२.०७.२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्यानंतर समितीने परिशिष्टांसह सादर केलेला इंग्रजीमधील अहवाल देखील केंद्र शासनाकडे दि.१६.११.२०१३ रोजी पाठविला.

तद्नंतर सदर प्रस्तावाबाबत सचिव, प्रधान सचिव, मुख्य सचिव, मंत्री, मुख्यमंत्री यांचे स्तरावर सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला.

दि. २७.०२.२०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिनाचे' औचित्य साधून, सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी शिफारस करणारा शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळांच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला.

या संदर्भात राज्यशासनाचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समिती मार्फत विचाराधीन असल्याचे केंद्रशासनाने त्यांच्या दि. २०/१०/२०२० च्या पत्रान्वये कळविले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकर मिळावा यासाठी पत्र माहिम राबवून राष्ट्रपती महोदयांना साधारणपणे १ लक्ष पत्रेही पाठविण्यात आली.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री यांनी मानले केंद्र सरकारचे आभार

विज्ञानवादी विचार ! त्यांच्याविषयी आदर व्यक्त करायला स्वातंत्र्यवीर ही उपाधी आणि 'ने मजसी ने' गायिले की झाले. कशास हवा त्यांचा विज्ञानवादी विचार? हे सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीत. तेव्हा सावरकरांनी तो केला असेल म्हणून काय झाले? एकदा का राज्यमातेचा दर्जा मिळाला की तीस 'उपयुक्त पशु' ठरवणा-या सावरकरांस विसरलेले बरे. 'राज्यमाते'च्या पुत्राविषयीही सावरकर असेच काही अद्वातद्वा बोलले आहेत. त्यामुळे त्यांच्या अशा वाड्मयावर एकदा बंदी घातली की प्र न मिटला. महाराष्ट्र सरकारनेच बंदी घातली म्हटल्यावर राज्याबाहेर त्यांचे वाचणार कोण आणि कशाला? यथावकाश सगळ्यांच्या मनात 'राज्यमाता' घर करून बसतील यात शंका नाही.

फक्त कोणी आता 'राज्यपिता कोण' हा प्रश्न तेवढा उपस्थित करू नये. प्रत्येक 'मातेस' एक भिन्नलिंगी साथीदार असल्याखेरीज तूर्त तरी प्रजोत्पादन होऊ शकत नाही, हे खरे असले तरी उभयतांतील 'संबंध' हे क्षणिक असतात असे साक्षात आचार्य अत्रे यांनीच सांगून ठेवलेले आहे. (पाहा : स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळची माता असते.) तेव्हा राज्यपिता कोण हा प्र न अयोग्य. हे असले क्षुद्र मुद्दे विसरून आपण सर्व जण गायींस राज्यमातेचा दर्जा देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करू या आणि हा दर्जा देता यावा म्हणून या राज्याची अवस्था जणू गोठा अशी केली याबद्दल सरकारचे आभार मानू या.



किनवट : शहरातील दुर्गा मैदानात शारदीय नवरात्रौत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा आहे. येथील सार्वजनिक दुर्गा मंडळाच्या पदाधिका-यांच्या सुयोग्य नियोजन, भक्तिमय व आनंदी, खेळीमेळीच्या वातावरणामुळे मागील अनेक वर्षापासून येथे यशस्वी आयोजन करण्यात आलेलो आहे. आज घटस्थापने निमित्त भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी उपगराध्यक्ष श्री अनिल तिरमनवार व सौ रमणा अनिल तिरमनवार यांनी घटस्थापना व पूजा केली तो मागील १० वर्षापासून घटस्थापना व देवीची पूजा नित्य नेमाने करत आहेत. यावेळी उपस्थित मंडळाचो पदाधिकारी व भाविक भक्त.

# व्यंकटरावाचे कार्य हे युवकांना प्रेरणादायी-खासदार अशोक चव्हाण

**लोकादेश न्यूज किनवट : व्यंकटराव नेमानीवार यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस म्हणजे तळागाळातील समाजाच्या साठी तळमळीने काम करणा-या सच्चा कार्यकर्त्याचा गौरव सोहळा करण्यासाठी आज आपण इथे एकत्र जमलो आहोत . असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांनी किनवट येथे केले.**

माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेमानीवार यांचा ७५ वा अमृत महोत्सव मोठ्या थाटात येथील कलावती गार्डन येते संपन्न झाला त्यावेळी खासदार अशोकराव चव्हाण बोलत होते, पुढे बोलताना खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की, मी १७, १८ वर्षाच्या असताना पासूनची माझी आणि व्यंकटराव नेमानीवार यांची मैत्री आहे.आम्ही केव्हाही एकमेकांत दुजाभाव केला नाही. मी वेळोवेळी दिलेले आदेश व्यंकटराव नेमानीवारी यांनी तंतोतंत पाळले असून भविष्यातह पाळतील असा आत्मविाास मला आहे. त्यांना ७५ वर्ष कधी झाले हे आम्हाला कळालेच नाही. सध्या निवडणुकीचे वारे वाहत असून त्याच पार्‍भूमीवर मी माझ्या मित्राच्या अमृत महोत्सवाच्या व वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी या ठिकाणी आलेलो आहोत. राजकारणात केव्हाही व कधीही काही घडू शकतो यदा कदाचित व्यंकटराव यांची ची वर्णी सुद्धा लागू शकते असा संकेत त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. प्रारंभी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे आगमन कार्यक्रम स्थळी होताच ढेमसा व बंजारा नृत्याने त्यांचे स्वागत करण्यात आले. आदिवासी शहणाई व ढोल च्या गजरात कार्यक्रमाच्या ठिकाणी पाहुण्यांचे आगमन झाले. दीपप्रज्वलन झाल्यावर महात्मा गांधी व यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. स्वागत गीता नंतर उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. व्यासपीठावर आमदार भीमराव केराम, आमदार अमरनाथ राजूरकर, नामदेवराव केशवे, नांदेड जिल्हा परिषदच्या माजी अध्यक्षा मंगाताई अंबुलगेकर, आनंद गुंडिले , योगी श्याम भारती महाराज भाजपाचे



ज्येष्ठ नेते डॉ.अशोक पाटील सूर्यवंशी, धरमसिंग राठोड मराठवाडा विकास परिषदेचे अध्यक्ष गंगन्ना नेमानीवार यासह विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. साहेब जेथे आम्ही तेथे असे उद्‌गार यावेळी व्यंकटराव नेमानीवार यांनी काढले. अमृत महोत्सवी वाढदिवसा निमित्त व्यंकटराव नेमानीवार यांची पुस्तके व मिठाई ची तुला करण्यात आली. विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ आनंद भंडारे यांनी केले. सोपानराव केंद्रे, राघू मामा, सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ मार्तंड कुलकर्णी व प्रा. तपन कुमार मिश्रा यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. किरण व्यंकटराव नेमानीवार यांनी मानले.तर सदरील अमृत महोत्सव सोहळ्यास तेलंगाना, विदर्भ व मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते व सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरस्वती शिक्षण संस्थेचे प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची पोहरादेवीला सभा नांदेड विमानतळावर आज आगमन व प्रस्थान



नांदेड दि. ४ ऑक्टोबर :- बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवी येथे नंगारा म्युझियम लोकार्पण व जाहीर सभेसाठी शनिवार ५ ऑक्टोबरला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येणार आहेत. सकाळी ११ वा. पोहरादेवी येथे होणा-या कार्यक्रमासाठी नांदेड येथील गुरूगोविंदसिंघजी विमानतळावर त्यांचे सकाळी १० वा. आगमन होणार आहे. या ठिकाणावरून ते हेलिकॉप्टरने पोहरादेवीला पोहचतील.

**प्रधानमंत्र्यांचा दौरा पुढीलप्रमाणे आहे...**

सकाळी ८.०५ वा. ते दिल्ली विमानतळावरून नांदेडसाठी निघतील. नांदेड येथे गुरूगोविंदसिंघजी विमानतळावर त्यांचे सकाळी ९.५५ वा. आगमन होईल. सकाळी १० वा. विशेष हेलिकॉप्टरने पोहरादेवीकडे प्रयाण करतील. सकाळी १०.४५ ला वाशिम जिल्ह्यातील पोहारादेवी हेलिपॅडवर त्यांचे आगमन होईल. पोहरादेवी येथील जगदंबा मंदिरात संत सेवालाल महाराज, संत रामराव महाराज यांच्या समाधी स्थळाचे ते दर्शन घेतील. सकाळी ११.१५ वा. बंजारा विरासत नंगारा म्युझियमचे ते लोकार्पण करतील. त्यानंतर सकाळी ११.३० वा. पोहरादेवी येथील जाहिर सभेमध्ये ते जनतेला संबोधित करतील. दुपारी १२.५५ वा. पोहरादेवी येथून प्रस्थान करून १.४५ वाजेच्या सुमारास नांदेड विमानतळावर त्यांचे आगमन होईल. त्यानंतर दुपारी १.५० ला नांदेड विमानतळावरून ते मुंबईकडे प्रयाण करतील.

# गंगेचे महत्त्व जाणून तिचे पावित्र्य राखणे हे प्रत्येक नागरीकाची जबाबदारी आहे-ह.भ.प.नारायण महाराज

लोकादेश न्यूज, किनवट : घटस्थापना नवरात्र महापर्वकाळ दिनी शिवमंदिर संस्थान पैनगंगा तीरी किनवट येथे गंगा पूजन व महागंगा आरती दिनांक ३ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली. त्या निमित्त आदरणीय श्री नारायण महाराज माधापूरकर तेलंगणा यांचे सत्संग प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये बोलताना महाराजांनी गंगेचे महत्व जाणून तिचे पावित्र्य राखणे हे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे जल है तो कल है और जल है तो जीवन है असा महान संदेश देत ज्याप्रमाणे धरण भरल्यानंतर धरणाचे दरवाजे उघडण्यात येतात आणि दरवाजे नाही उघडलो तर धरण फुटण्याची भीती असते त्याप्रमाणे सुखी समृद्ध व श्रीमंत व्यक्तींनी आपल्याकडे भरपूर



संपत्ती असेल तर त्या संपत्तीचा थोडाफार विनियोग सामाजिक कार्यासाठी करणे आवश्यक असते असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. दीप प्रज्वलन आदरणीय श्री गंगेश्वर महाराज, श्री पवार गुरु स्वामी व श्री मेघराज सेठ आदिलाबाद यांच्या हस्ते करण्यात आले. गंगा पूजन श्री रवी कोरडे दांपत्य व श्री सुनील वट्टमवार दांपत्य यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन श्री अनिरुद्ध केंद्रे सर यांनी केले व प्रास्ताविक श्री संजय पवार सर यांनी केले प्रास्ताविकात सरांनी आदरणीय महाराजांच्या सामाजिक कार्याचा व उपक्रमाचा संक्षिप्त आढावा सादर केला. आदरणीय श्री पवार गुरूस्वामी यांनी गंगा आरतीचे अतिशय उत्कृष्ट नियोजन करून गंगा आरती संपन्न केली. गंगा आरती कार्यक्रमासाठी किनवट व परिसरातील महिला व पुरुष भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी किनवट शहरातील संपूर्ण मंदिर समितीने योगदान व सहकार्य केले समस्त सत्संग परिवार किनवट यांच्यावतीने कार्यक्रमाचे योग्य नियोजन व आयोजन करण्यात आले.

# किनवट विधानसभा : भाजप श्रेष्ठीने उमेदवाराच्या पसंतीसाठी घेतले पदाधिका-यांचे मतदान

**लोकादेश न्यूज, किनवट : किनवट - माहूर विधानसभा निवडणुकीत भाजपचा उमेदवार कोण असावा,यासाठी भाजपने मंगळवारी दि.१ पक्षनिरीक्षक माजी आमदार गजानन घुगे यांच्या उपस्थितीत गोकुंद्दा विश्रामगृहात पदाधिका-यांचे गुप्त मतदान घेतले.**

भाजप मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीच्या धर्तीवर महाराष्ट्रातही पक्षाचा संभाव्य उमेदवार कोण असावा, यासाठी एका चिठ्ठीवर पसंती क्रमांक १,२,३ चे मात नोंदविण्यासाठी प्रादेश पदाधिकारी, कार्यकारिणी, विविध आघाडी, मोर्चा, प्रकोष्ठचे पदाधिकारी तसेच नांदेड जिल्हा व किनवट, माहूर तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. चिठ्ठीवर पसंती क्रमांक लिहिल्यानंतर मतदारांनी स्वतःच ती चिठ्ठी लिफाफाबंद करून निरीक्षक घुगे यांच्याकडे सुपूर्द केले. मत सांबांधिता पदाधिका-याचेच आहे, याची खातरजमा होण्यासाठी मतदानानंतर संबंधित पदाधिकारी मतदारांची स्वाक्षरी घेण्यात येवून बंद लिफाफ्यावर मतदाराचा अनुक्रमांक टाकण्यात आला.मतदान प्रक्रियेत विद्यमान आमदार भीमराव केराम यांच्यासह इच्छूक उमेदवार डॉ.अशोक पाटील सूर्यवंशी, संध्या राठोड,धरमसिंग राठोड, अशोक नेम्मानीवार, प्रकाश टारपे, सुधाकर भोयर, प्रा.किशन मिराशे यांच्यासह दोनशेच्यावर पदाधिका-यांनी सहभाग नोंदविला. बंद लिफाफे प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती पक्ष निरीक्षक गजानन घुगे यांनी दिली.पदाधिका-यांच्या गुप्त मतदानासाठी इच्छूक उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन केले.

# अभियंता प्रकाश टारपे यांचा भाजपात प्रवेश



लोकादेश न्यूज, किनवट : जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे माजी अभियंता प्रकाश टारपे यांनी मंगळवारी दि.१ भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. प्रकाश टारपे यांनी अलीकडेच जि.प. सेवेचा राजीनामा दिला.ते किनवट - माहूर विधानसभा निवडणूक भाजपकडून लढविण्यास इच्छूक आहेत.त्यादृष्टीने प्रकाश टारपे यांनी मंगळवारी भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा निवडणूक निरीक्षक गजानन घुगे यांच्या उपस्थितीत गोकुंद्दा विश्रामगृहात भाजपमध्ये प्रवेश केला.यावेळी आमदार भीमराव केराम यांच्यासह डॉ.अशोक पाटील सूर्यवंशी,महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ. संध्या राठोड, सरचिटणीस भावना दीक्षित,तालुकाध्यक्ष बालाजी आलेवार, अनिल तिरमनवार, संजय रेड्डी, शिवा आंधळे, बालाजी धोत्रे आदी उपस्थित होते.

# ४६ लाख रुपये किंमतीचा गांजा जप्त सहा आरोपींना घेतले ताब्यात; एक फरार

लोकादेश न्यूज, किनवट : तालुक्यातील मौजे शिवणी बामणी (बेचिराख) आणि डोंगरगाव शेत शिवारातील पहाडपट्टीचा फायदा उचलून काही शेतक-यांनी गांजाची शेती केली असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे नांदेड, किनवट व इस्लापूर पोलिसांसह कृषी विभाग, महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गांजा शेतीवर धाड टाकून सलग दोन दिवसांच्या कारवाईत ४६ लाख २२ हजार ८०० रुपये किमतीचा ९२४.४८ किलो गांजा जप्त केला असून, सात आरोपीविरुद्ध किनवट पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. सहा आरोपीना अटक केली असून, एक फरार आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार एक आक्टोबर रोजी रात्री बाराच्या सुमारास पोलिसांनी नीळकंठ विनाथ शेळके (वय ४०), विनोद शिवाजी हुरदुके (वय ४०), संजय गोविंद हुरदुके(वय ३५) राजाराम सिदोबा बावधाने (वय ५२), कोंडबा गैयनाजी बावधाने



(वय ६६) आणि ईरदास किशन हुरदुके(वय ५०) सर्व रा. डोंगरगाव या सहाजणांना अटक केली आहे. त्यांच्यासोबतच एक शेतकरी फरार आहे. त्याचा शोध पोलिस घेत असल्याची माहिती, भोकरचे अप्पर पोलिस अधीक्षक खंडेराय धरणे यांनी दिली. किनवट, इस्लापूर, स्थानिक गुन्हे शाखा, आरसीपी प्लाटुनचे मिळून एकूण १४० अंमलदार व दहा पोलिस अधिकारी यांच्या पथकाने रात्री दोनच्या सुमारास घटनास्थळावर रात्रभर पायी चालत जाऊन सदर आरोपितांच्या शेतात छापा टाकला असता, कापूस व तूर असलेल्या पिकांच्या शेतात गांजाची लागवड केल्याचे दिसून आले. तसेच बुधवारी (दि.२) मौजे दिग्रस तांडा शिवारातील अमरसिंग साबळे या सातव्या शेतक-याच्या शेतामध्ये छापा मारण्यात आला. तेथेही कापूस व तुरीच्या पिकामध्ये गांजा लागवड केल्याचे आढळून आले. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलिस अधीक्षक खंडेराव धरणे, किनवटचे उपविभागीय पोलिस अधीकारी रामकृष्ण मळघणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या पथकासह किनवट पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील बिर्ला, देविदास चोपडे, सागर झाडे, दिनेश येवले, उमेश भोसले, अतुल डाके, एस. आर. मुंडे, प्रकाश बोदमवाड, लकुळे, पुरी, दंगा नियंत्रण पथकाचे महिला व पुरुष अशा ४२ जणांच्या पथकाने केली.

**सहा आरोपींना कोठडी**

अटकेतील सहा आरोपींना बुधवारी (दि.दोन) किनवटच्या दिवाणी व फौजदारी न्यायालयातील न्यायमूर्ती पी.एम. माने यांच्या समोर उभे केले असता, त्यांनी आरोपींना एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती, नंतर दुस-या दिवशी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आल्याची माहिती किनवटचे पोलिस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी दिली.

# उदे गं अंबे उदेच्या गजरात माहूर गडावर घटस्थापना

## आदिशक्तीच्या दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी






**लोकादेश न्यूज, माहूर (साजीद खान) : महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तीपिठा पैकी एक पुर्ण व मुळपिठ असलेल्या श्रीक्षेत्र माहूर येथील श्री रेणुका माता गडावर आज गुरुवार दिनाक ३ ऑक्टोबर रोजी विधी पंरपंरेनुसार वेदिक मंत्रोच्चारात घटस्थापना होऊन नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला.**

अश्वीन शुद्ध प्रतिपदेला ऊदे ग अंबे उदे च्या गजरात पहील्या माळीला (दिवसाला) सकाळी ७ वाजता पासून टि.व्हि. स्टार सनई वादक नितिन धुमाळ व संच (नासिक) यांच्या सनई च्या सूरात व पौराहीत्य वेदशास्त्री निलेश केदार गुरूजी,अनिल काण्णव यांचा संच व वेद शाळेचे शिष्यांनी प्रसिद्ध घोषात अभिषेकांचे सहस्त्र आवर्तन मख्य देवता श्री रेणुका मातेच्या वैदिक महा पूजेने सुरवात झाली. गणेश पुजन, कलश (वस्त्र) पुजन, पुण्याहवाचन, मातृकापुजन, ऋग्वेद पारायण शतशक्ती पारायन, करण्यात आले, पूजारी भवानिदास भोपी, शुभम भोपी, विनायक फांदाडे, विश्वस्त बालाजी जगत यांच्या हस्ते पंचामृताने अभिषेक करण्यासाठी सिंगार, अलंकार करून पिवळा रंगाचे पैठनी महावस्त्र परीधान करण्यात आले. श्री रेणुका मातेच्या मुख्य गाभा-यातिल व परीसरातील परिवार देवता श्री तुळजाभवानी मंदीर, श्री परशुराम मंदीर, श्री महालक्ष्मी मंदिरात एका पाषानाच्या कुंडा मध्ये मातृका भरून त्यात सप्त धान्य टाकुन, कुंडावर मातीची कलश,त्यात नागवेलीची पाने व श्रीफळ, साभोताल पाच उसाचे धांडे उभारुन आणि त्या अधारे कलशावर (पुष्पहार) पहिली माळ चढवून सकाळी १० वा, संस्थानचे पदसिद्ध अध्यक्ष तथा प्रथम जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती सुरेखा कोसमवार,सहाय्यक जिल्हाधिकारी तथा सचिव मेघना कावली,विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय काण्णव, अरविंद देव, दुर्गादास भोपी यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. पायस नैवेद्य गायीचे तुप व दुपारी ११:३० वाजता श्री मातेस महानैवेद्य ठेउन महाआरती करण्यात आली.

अध्यक्ष सुरेखा कोसमवार, सचिव मेघना कावली यांच्या हस्ते कुमारीका पुजन, आरती करण्यात आली,नंतर छबिना मिरवणूक काढण्यात येऊन परिसरातील परिवार देवतांची पूजा नैवेद्य व आरती पूजन करण्यात आले

अखंड नंदादिप पूजन, सुवर्ण अलंकार पूजन करण्यात आले,श्री दुर्गासप्तशती शतचंडी पाठाची सुरवात, संकल्प, चतुर्वेद वेद पारायण सुरवात करण्यात आली,पायस नैवेद्य,गायीचे तुप,छबीना परिवार देवता पूजन झाल्या नंतर भाविकांन साठी परशुराम मंदिर परीसरात महाप्रसाद सूरु करण्यात आला. प्रतिपदे पासुन दशमी पर्यंत मंदीरात अखंड देवी समोर नंदादिप तेवत ठेउन दरोरोज पायास म्हणजे दही भात, पुरणपोळीचा नवैद्य, आरती नंतर छबिना काढला जावून रेणुका ज्या गडावर प्रकटली त्या गडाला प्रदक्षीना घालुन छबिना परत रेणुका मंदिरात येत असतो.

यावर्षी मुंबई येथील उघोगपती नरेंद्र हेटे यांनी नवरात्र निमित्त सोन्याने गाठवलेले ५ फुट मंगळसुत्र व डायमंड बिंदी अर्पन केली आहे ह्यामुळे भाविकांना या वर्षी रेणुका मातेचे नविन रूप पाहावयास मिळत आहे.

गडावर जाणा-या रत्यावरील टि, पॉइंट व मेन रोडवर पोलीसांनी बॅरीकेट लाउन खाजगी वाहनांना गडावर जाण्यास बंदी केली आहे.ऐसटी महामडळा कडून १०० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. नगरपंचायत कडून पार्किंग ची व्यवस्था करण्यात आली आहे, आज पहिल्याच माळिला महाराष्ट्, तेलंगाना राज्यातील भाविकांनी सकाळ पासूनच गर्दी केली होती, कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता अप्पर पो,अधिक्षक खंडेराव धरने उपविभागिय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघने,सपोनी शिवप्रकाश मुळे हे आपल्या कर्मचारी सह चोख बंदोबस्त ठेवत आहेत.

# मतदानाची टक्केवारी वाढविणे आगामी निवडणूकीतील प्रथम लक्ष्य : जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

## विधानसभा निवडणुकी संदर्भातील चार जिल्ह्याचे प्रशिक्षण नांदेडमध्ये संपन्न

**नांदेड दि. ३० सप्टेंबर : यावेळी महाराष्ट्राची निवडणूक वेगळी आहे. निवडणूक आयोगाचे या निवडणुकीकडे अतिशय गांभीर्याने लक्ष असून मतदानाची टक्केवारी वाढविणे हे पहिले लक्ष्य ठेवण्याचो आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज येथे केले. छत्रपती संभाजी नगर विभागातील नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्याच्या निवडणूक नोडल अधिकारी व प्रशिक्षण अधिका-यांच्या कार्यशाळेचा शुभारंभ करताना ते बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, आतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा निवडणूक उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, राष्ट्रीय स्तरांवरील प्रशिक्षक उपजिल्हाधिकारी ललित व्हाडे, गणेश पवार, दत्तू शेवाळे, अनिकेत सोनवणे यांच्यासह चार जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी मुंबई येथे झालेल्या भारत निवडणूक आयोगाच्या बैठकीचा संदर्भ देऊन निवडणूक आयोगाने ज्या अपेक्षा व्यक्त केल्या त्याबाबतची माहिती उपस्थितांना दिली. ते म्हणाले, यावेळी महाराष्ट्रातील मतदान प्रक्रियेवर लक्ष वेधले असून राज्यात प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना मतदान करणे सुखद वाटले पाहिजे. गेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये घसरलेली टक्केवारी आणि मतदारांमध्ये मतदानातील अनास्था दूर करण्यासाठी सर्व प्रयत्न करण्यासाठी सिद्ध रहा, असेही त्यांनी सांगितले.

नवनवीन उपक्रमासोबतच लोकशाही प्रक्रियेत सामान्य नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी उत्तम असे प्रशिक्षण देण्याच्या सूचना यावेळी त्यांनी प्रशिक्षकांना केल्या.अतिरेकी कारवाया होत असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुकांची आकडेवारी उत्तम आहे मात्र महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात त्यामध्ये घट होत आहे त्यामुळे संपूर्ण यंत्रणेने यासाठी एकजूट होऊन काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूक आयोगाकडून प्रशिक्षण घेऊन आलेले उपजिल्हाधिकारी ललित व-हाडे,अनिकेत सोनवणे, गणेश पवार, दत्तू शेवाळे, यांनी यावेळी अनुक्रमे निवडणुकीतील उमेदवारांची पात्रता अपात्रता, पोस्टल बॅलेट, असुरक्षा उपयोजना, निवडणूक खर्च,पेड न्यूज या संदर्भात मार्गदर्शन केले. तत्पूर्वी अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांनी निवडणूक हा विषय दरवेळी नव्याने प्रशिक्षण घेण्याचा व सातत्याने उजळणी करण्याचा असून अतिशय बिनचुकता या कर्तव्यात येणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुरा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com